

**राजीव तांबे.**

+91 93223 99859

web : www.rajivtambe.com

email - rajcopper@gmail.com

राजीव तांबे हे अनेक पुरस्कार व मानसन्मान प्राप्त लेखक, कवी, नाटककार असून सातत्याने मुलांमध्ये व मुलांसाठी काम करणारे सर्जनशील बालसाहित्यकार आहेत. विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी, पालकांसाठी देशात आणि विदेशात त्यांनी अनेक कार्यशाळा घेतलेल्या आहेत. अभिनव शिक्षणपद्धतींतील ते तज्ज्ञ आहेत.

युनिसेफसाठी शिक्षण सल्लागार म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्रातील अनेक शाळांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. तेथील शिक्षकांच्या व मुलांच्या अनेक कार्यशाळा घेतल्या आहेत. जिथे एसटी जात नाही अशा दुर्गम प्रदेशातील आणि वाडी-वस्त्यांवरील शाळांचाही त्यात समावेश आहे. मेळघाटसारख्या आदिवासी भागामध्ये एक वर्ष राहून समाजकार्य केले आहे. प्रथम, डोअरस्टेप स्कूल अश्या अनेक स्वयंसेवी संस्थांशी ते जोडले गेलेले आहेत.

आपल्या शैक्षणिक कामाचे, मुलांसोबतचे , पालकत्वाचे अनुभव वेळोवेळी लोकसत्ता , महाराष्ट्र टाईम्स, सकाळ  यांसारख्या नामवंत वर्तमानपत्रातून सदर लेखन करून मांडले आहेत. त्यांच्या समृद्ध आणि बहुविध अनुभवामुळे,त्यांच्या श्रोत्यांची व वाचकांची नाळ त्यांच्याशी लगेच जुळते.

गोष्टी, लेख, परिसंवाद, कार्यशाळा, टीव्ही शोज् अशा विविध माध्यमांमधून त्यांनी मुलांसाठी काम केले आहे.

**मराठीतील अग्रगण्य बालसाहित्यिक** - 41 भाषांतून 133 पुस्तके प्रकाशित

**'बालसाहित्यातील विशेष योगदानाबद्दल' साहित्य अकादमी पुरस्कार.** 2016

मुलांसाठी कथा, कविता, कादंबरी, एकांकिका, नाटक, विज्ञानकथा, विज्ञान भयकथा, रुपककथा, प्राणीकथा, रहस्यकथा, भाषेचे आणि गणिताचे खेळ, शून्य खर्चाचे विज्ञानाचे प्रयोग, सुजाण पालकत्व, शिक्षणविषयक लेखन अशा **विविध 43 साहित्य प्रकारात राजीव तांबे यांनी लेखन केले आहे.** अनेक वृत्तपत्रांतून सातत्याने स्तंभलेखन. मासिकांचे संपादन.

**राजीव तांबे यांच्या बालसाहित्यावर प्रबंध लिहून पाच जणांना 'डॉक्टरेट' ही पदवी मिळाली आहे.**

**'एबीपी माझा' या चॅनेलवर सलग 2 वर्षे पालकांसाठी लाइव्ह कार्यक्रम : "मुलांच्या विश्वात"**

**अनेक वर्ष सातत्याने केवळ बालक, पालक व शिक्षक यांच्यासाठीच लेखन व कार्यक्रम.**

**ऑस्ट्रेलियन मराठी विद्यालय, ऑस्ट्रेलिया, स्वीडन आणि दुबई येथे मुलांसाठी, पालकांसाठी आणि शिक्षकांसाठी विविध कार्यशाळांचे आयोजन.** (2013. 2021. 2022. 2023)

- युनिसेफचे शैक्षिणक सल्लागार
- महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचे सदस्य
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आढावा समितीचे सदस्य
- देशात आणि परदेशात अनेक परिषदांमधून पेपर्सचे वाचन
- देशात आणि परदेशात मुले,पालक आणि शिक्षकांसाठी कार्यशाळांचे आयोजन.
- "गंमतशाळा' ही संकल्पना मांडून प्रत्यक्षात तिचे रूपांतर एका चळवळीत केले.
- देशात आणि विदेशात पुस्तके प्रकाशित
- अनेक राज्यस्तरीय आणि राष्ट्रस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित.

**पुरस्कार**

- द. का. बर्वे. उत्कृष्ट निर्मिती पुरस्कार. 1988 (कवितासंग्रह)
- महाराष्ट्र शासनाना उत्कृष्ट साहित्य पुरस्कार. 1988-89 (कवितासंग्रह)
- मराठी बाल साहित्य परिषद पुरस्कार. 1989 (कथासंग्रह)
- बाल रंगभूमीचा उत्कृष्ट लेखन पुरस्कार 1990 (एकांकिका)

**ग. ह.पाटील पुरस्कार (औरंगाबाद)1992**

(बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)

- मराठी बालकुमार साहित्य पुरस्कार 1993 (एकांकिका)
- उत्कृष्ट बाल साहित्य निर्मितीचा राष्ट्रीय पुरस्कार 1993 (कथासंग्रह)

**पुणे महानगरपालिकेकडून 'सन्मानित' 1995**

(बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)

- **भारत सरकारचा पुरस्कार 1996**. (बालचित्रवाणी : आनंददायी शिक्षण' कार्यक्रम)
- कोकण मराठी साहित्य पुरस्कार 1997 (कादंबरी)

**'सावाना पुरस्कार' नासिक 2000**

(बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)

- महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2000-01 (कथासंग्रह)
- महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2002-03 (शैक्षणिक पुस्तक)
- आगाशे पुरस्कार. बुलढाणा. 2002 (शैक्षणिक पुस्तक)
- वा. रा. ढवळे. उत्कृष्ट निर्मिती पुरस्कार. 2003 (शैक्षणिक पुस्तक)
- महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2007-08 (कथासंग्रह)

- वा. अ. रेगे. ठाणे. उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2009-10 (पालकांसाठी पुस्तक)
- ‘गाडगीळ पुरस्कार’ मुंबई मराठी साहित्य संघ. 2010-11 (कथासंग्रह)
- महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2011 (विज्ञानकथा)
- महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2011-12 (विज्ञान प्रयोगकथा)
- **अध्यक्ष, कालिदास साहित्य संमेलन. सिडनी (ऑस्ट्रेलिया) 2013**
- ‘प्रा.शिरोळे पुरस्कार’ म.सा.प. पुणे. 2013 (बालसाहित्यातील विशेष योगदानाबद्दल)
- **लोकमत बालसाहित्य पुरस्कार. 2013.** (प्राणीकथा संच)
- **अध्यक्ष, आखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन. 2013.**
- महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार 2014-15 (विज्ञान प्रयोगकथा)

  जीवन गौरव पुरस्कार. (नांदेड) 2015.

  (बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)
- श्री. श्रीपाद देशपांडे पुरस्कार. (पुणे) 2015

  (बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)
- **साहित्य अकादमी पुरस्कार. 2016**

  **(बालसाहित्यातील विशेष योगदानाबद्दल)**
- **सद्भाव पुरस्कार. साहित्य वेदी.कर्नाटक 2016**

  (बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)
- **गुरुवर्य आबासाहेब अत्रे पुरस्कार - 2022**

  (बालसाहित्यातील आणि बालशिक्षणातील विशेष योगदानाबद्दल)